Wednesday, March 26, 2025
8:45 PM

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २७/०३/२०२५

**जबरी चोरी**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे राजापेठ अप क्र१२९/२५ कलम ३०९(६), ३(५) भान्यास | मनोहर मांगल्य समोर रोडवर अमरावती | घ.ता.वेळ २६/०३/२५ चे ०३.४५ वा दा.ता.वेळ २६/०३/२५ चे १२-०६ वा | अहमद सिराज मोहम्मद हमिद वय ४२ वर्ष रा. सागर नगर शुक्रवार बाजार अमरावती | ४ अनोळखी इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की वर नमुद घ.ता वेळी व ठिकाणी मनोहर मांगल्य समोर चार इसम एका मोटार सायकल वर येवुन हात देवुन थांबविले मी तेथे थांबलो असता मोटार सायकल वरील ३ इसम मिळुन मला मारणे सुरु केले १ इसम मोटार सायकल वर बसुन होता ३ सिमापैकी १ इसम ने चाकु काढुन माझ्या हातावर व कमरेवर ममारुन जखमी केले व खिश्यामधील 70.000/- रुपय घेवुन पळुन गेले मला जखमी अवस्थेत माझ्या नातेवाईकानी भरती के अशा अर्जदाराच्या जबानी रिपोर्ट वरुन डीओ आदेशाने सदरचा गुन्हा तपासात घेतला |

**दुखापत**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र २४८/२०२५ कलम ११८(१), ३५१(२), ३५२ बी एन एस | ग्राम पोहरा जि अमरावती | दि.२६/०३/२०२५ चे ०८.०० वा<br>दि.२६/०३/२०२५ चे १३.०४ वा | सुभाष अमरसिंग जाधव वय ४० वर्ष धंदा ठेकेदार , रा भानखेडा खुर्द ता जि अमरावती | दशरथ आडे वय ५५ वर्ष रा चिरोली ता चांदुररेल्वे जि अमरावती | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि हे घरबांधकामाचे ठेके घेत असुन त्यांचेसोबत काम करणारा आरोपी याने चिरोली गावात घर बांधण्याचे काम घेतले होते त्याकरीता फि ने त्यास मजुर दिले होते व त्यांचे मोबाईल क्रमांक सुद्धा आरोपीस १ महिन्यापुर्वी दिले होते परंतु सदर मजुर हे आरोपी क डे कामाला गेले नाही म्हणुन आरोपी फि स फोन करुन मजुराबाबत विचारणा क रत होते.नमुद घटना ता वेळी फि हे कामावर असताना आरोपी तीथे आला व मजुराच्या कारणावरुन फि ला शिवीगाळ करुन कामावरील सेंट्रींगची फळी उचलुन फि चे डोक्यावर मारली त्यामुळे फि चे डोक्याला लागुन रक्त निघाले व मारण्याची धमकी देवुन निघुन गेला अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रीअत्याचार

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र २४९/२० २५ कलम ७४,७५, २९६, ११५(२), ३२४(४) , ३ (५) बी एन एस | मंगलधाम कॉलनी अमरावती | दि.२२/०३/ २०२५ चे २२.३० वा दरम्याण<br><br>दि.२६/०३/ २०२५ चे १५.४७ वा | एक महीला | १.रविन्द्र विजय गोमासे २.तेजस रविन्द्र गोमासे ३.विजय गोमासे तिन्ही रा. मंगलधाम कॉलनी अमरावती | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि चे पती अविनाश लव्हाळे यांचे कॉटन मार्केट येथे धान्याचे दुकान असुन फि चे पती व आरोपी क्र १ यांच्यामध्ये पैशाचे व्यवहार असुन आरोपी क्र १ याचेकडे ४,००,०००/-रु घेणे बाकी आहे. आरोपीसोबत फि व त्यांच्या पतीचे आरोपीच्या परिवारासोबत चांगले संबंध असल्याने फि त्यांच्या कुटुंबातील लोकांना ओळखते. नमुद घटना ता वेळी फि घरी हजर असताना त्यांना पती चे मित्र नामे नरेन्द्र लकडे यांचा फोन आला व त्यांनी सांगितले की, अविनाश व मी रविन्द्र गोमासे याचेकडे गेलो असता त्याने पैशाच्या कारणावरुन अविनाश भाऊ सोबत वाद करुन भांडण केले तसेच मारहण केली असे सांगितले वरुन फि आरोपीच्या घरी गेली असता फि चे पती हे रोडवर एका बाजुला बसुन होते त्याबाबत फि ने विचारणा केली असता त्यांचे पतीने फि स सांगितले की, त्यांना लाकडी काठीने डोक्यावर, डावे हातावर मारहाण करुन लाथाबुक्क्यांनी छातीवर तोंडावर मारहाण केली म्हणुन फि ने आरोपी क्र १ यास जाब विचारला असता आरोपी क्र २ याने फि चे कमरेत हात घालुन आरोपी क्र १ याने छातीला हात लावुन धक्का दिला व आरोपी क्र ३ याने म्हटले की अशलिल शिवीगाळ केली व तुझ्या नव-याला विचार असे म्हणुन शिवीगाळ केली अशा फि चे जबाणी रिपोर्ट वरुन वरुन सदरचा गुन्हा दाखल |